स्थापना : दि. १ मे. २००८


शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

विद्वत्प्रमाणित, यु.जी.सी. मान्यताप्राप्त त्रैमासिक

(Peer Reviewed Refered Research Journal )

ISSN No. 2319-6025


# शिविम संशोधन पत्रिका


वर्ष-पाचवे : अंक दहावा । एप्रिल,मे, जून, २०१७




शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Refered Research Journal )

ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली, मान्यता अ. क्र. ६४१७५)

**वर्ष-पाचवे : अंक दहावा**

एप्रिल-मे-जून २०१७

संपादक

**डॉ. शिवकुमार सोनाळकर**

कार्यकारी संपादक

**डॉ. अरुण शिंदे**

संपादक मंडळ

**डॉ. शिवाजी पाटील, डॉ. नंदकुमार मोरे,**

**डॉ. उदय जाधव, डॉ. गिरीष मोरे**

सल्लागार समिती

**डॉ. राजन गवस, डॉ. प्रकाश कुंभार,**

**डॉ. डी. ए. देसाई, डॉ. अनिल गवळी**

**प्रकाशक**

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

अनुराज, ७/ब, सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर ४१६ ०११

**मुद्रक**

भारती मुद्रणालय

८३२ ई वॉर्ड, शाहूपुरी ४ थी गल्ली, कोल्हापूर. फोन : (०२३१) २६५४३२९

मूल्य : रु. ५०/-

# अंतरंग

विंदा करंदीकर यांच्या कवितेतील सामाजिकता / डॉ. शोभा नाईक ३
'ब-बळीचा' : प्रयोगशीलता व भाषिक विशेष / प्रा. डॉ. संजय पाटील १४
'नागीण' मधील स्त्रीरूपे / तेजस चव्हाण २४
आदिवासी साहित्य संकल्पना / डॉ. कैलास महाले ४०
स्त्रीवाद व स्त्रीवादी समीक्षा पद्धती / प्रा. अमोल पुंडलिक चांदेकर ४७
'ज्ञानोदय'चे सामाजिक कार्य / प्रा. अविनाश भोरे ५२
सत्यशोधक जलसाकार रामचंद्र घाडगे / गजानन बाबासाहेब भिंगारदिवे ५९
शिखर शिंगणापूर शिवभक्त
बळीराजा : एक सांस्कृतिक अनुबंध / श्री. सिद्धमल्लय्या गुरूमुर्ती हिरेमठ ६९
शिविमवृत्त : निबंध आणि कथा लेखन स्पर्धा ७५
आवाहन ७९

**सूचना :** पत्रिकेत प्रसिद्ध होणाऱ्या लेखांच्या मतांशी संपादक मंडळ वा शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ सहमत असतीलच, असे नाही.



ISSN No. 2319-6025

✓

# विंदा करंदीकर यांच्या कवितेतील सामाजिकता

**डॉ. शोभा नाईक**

कविवर्य विंदांचा (गोविंद विनायक करंदीकर) जन्म २३ ऑगस्ट १९१८ चा आणि त्यांचा मृत्यू झाला तो १४ मार्च २०१० रोजी. सुमारे १९४० पासून त्यांच्या कविता लेखनाला सुरुवात झाली. जन्मशताब्धीच्या निमित्ताने त्यांच्या कवितांचा येथे पुनर्विचार करत आहोत. परंपरा आणि नवता एकत्रित राहून काही आकार विणू पाहत असणारे दिवस अगदी सुरुवातीपासूनच मराठी साहित्य विश्वाला ज्ञात आहेत. केवळ कलेसाठी कला असे न म्हणता मराठी भाषा साहित्य नेहमीच सामाजिकतेची पातळी जिवंत करण्याची प्रेरणा देण्याचा प्रयत्न करत राहिले. ज्ञान विज्ञान, भाव भक्ती, अनुभव अनुभूती यांची सलगी ते करत राहिले. मध्ययुगीन काळात महानुभाव आणि वारकरी यांनी साकारलेल्या त्या वाटांशी जोडून घेणारी आधुनिक दिवसातील केशवसुत मर्ढेकर - विंदा - भालचंद्र नेमाडे अशी परंपरा आपल्याला जागे ठेवते.

१९४९ साली विंदांचा 'स्वेदगंगा' हा पहिला काव्य संग्रह आला. त्यानंतर 'मृदगंध' (१९५४), 'धृपद' (१९५९), 'जातक' (१९६०) आणि 'विरूपिका' (१९८१) मध्ये असे पाच काव्यसंग्रह आणि काही बालकवितासंग्रह प्रकाशित झाले. त्यांच्या साहित्याला अनेक प्रतिष्ठेचे पुरस्कार लाभले व २००३ सालच्या भारतीय पातळीवरील सर्वोच्च साहित्यिक सन्मानाने ज्ञानपीठाने त्यांना सन्मानित करण्यात आले. त्यांनी अनेकविध साहित्य प्रकार हाताळले मात्र त्यामध्ये कविता केंद्रस्थानी राहिली. अर्थातच त्यांच्या लेखणीने फार मोठे योगदान मराठी साहित्यविश्वाला दिले आहे. त्याकडे आपण जेव्हा दृष्टिक्षेप टाकतो तेव्हा सर्व प्रथम त्यांच्या लेखनाच्या पार्श्वभूमीला जो काळ होता तो आपले लक्ष्य वेधून घेतो. श्रेष्ठ साहित्य निर्मितीला अत्यंत पोषक असा काळ विंदांना लाभला होता. प्रामुख्याने विंदांच्या सामाजिक कवितांचा विचार करताना त्यांच्या काळाची स्पंदने लक्षात घ्यावी लागतील.

भारतीय पारंपरिकतेचा आधुनिक वेध घेणे सुरु झालेल्या पर्यावरणात विंदा करंदीकर लिहित होते. आधुनिकता म्हणजे जुन्याचा पूर्ण त्याग नव्हे. तर परंपरा आणि नवता यामध्ये संवादी धागा हा नेहमी असला पाहिजे यावरील निष्ठेचे ते त्या काळातील प्रतिनिधी होते. त्या दिवसांना देशाच्या उंबरठ्यापर्यंत येऊन गेलेल्या महायुद्धाचीही पार्श्वभूमी होती. प्रत्यक्षात आपला देश युद्धभूमी नसला तरी ब्रिटिशांनी त्याचा युद्धाची छावणी म्हणून वापर केला होताच. त्यामुळे युद्धाचे समाज जीवनावर अनेक विपरीत परिणाम उमटले होते. महागाई आली, वस्तूंचे दुर्भिक्ष्य निर्माण झाले.

खेड्यांना त्याची फार झळ पोहचली, माणसे पोटासाठी शहराकडे धावली. शहरात झोपडपट्टी अवतरली, तेथील जीवन बकाल झाले, गुन्हेगारी वाढली, रेशनिंग सारखी खाती निर्माण झाली. कामगारवर्ग झपाट्याने वाढला. स्त्रियांनाही नोकरीसाठी बाहेर पडावे लागले. रूढ जीवन ढवळून काढणाऱ्या दिवसांमध्ये करंदीकर यांची प्रतिभा; काव्य निर्मिती हे व्रत जागवत होती. वार लावून त्यांचे कोल्हापुरात शिक्षण झाले.तिथे त्यांचा साहित्यिक पिंड पोसला. सामाजिक बंडखोरी करणाऱ्या कविवर्य माधव जुलियन यांना ते गुरु मानत. सुरुवातीला संघाचा सहवास, मग समाजवादाची जवळीक आणि त्यानंतर गांधीजींच्या खोल प्रभावाखाली ते आले. आधी केले मग सांगितले हे तत्त्व जगण्यात जे अंगिकारले होते त्याचा गडद ठसा कवितेतही उमटला. त्यांच्या कवितेवर वेगवेगळे प्रभाव अधोरेखित करण्याचे प्रयत्न होतात पण वास्तविक त्यांची कविता ही सच्च्या अंतरंगाची, सर्वसामान्य माणसाची, शोषिताच्या बाजूची आहे. त्या काळाने चालविलेल्या बौद्धिक चर्वण प्रक्रियेला सर्वार्थाने प्रतिसाद दिल्यामुळे त्यांच्या कविता ह्या बहुपेडी होताना दिसतात.

विंदा करंदीकर यांनी बहुविध प्रकारची कविता लिहिलेली आहे. पण त्यांची बहुतांशी कविता ही सामाजिक कविता आहे. त्यांच्या काव्य जाणीवेत मार्क्सवाद, अस्तित्ववाद, अद्वैतवाद, फ्रोइड सिद्धांत, आइंस्टाइन सिद्धांत या सर्व सरण्यांचा एकत्रित वावर असल्याचे त्यांच्या समीक्षकांनी अधोरेखित केले आहे. आणि खुद्द करंदीकर यांनी 'परंपरा आणि नवता' मध्ये आपली कविता सामाजिक, लैंगिक, व्यक्तिदर्शन आणि चिंतनात्मक जाणिवेतून निर्माण झाली असल्याचे म्हटले आहे. तर या पार्श्वभूमीवर आपण जेव्हा त्यांच्या कवितेवर लक्ष केंद्रित करतो तेव्हा प्रत्यक्ष जीवनानुभव आणि जीवनाचे सूक्ष्म अवलोकन यांचा आविष्कार ताकदीने होत असल्याचे त्यांच्या कवितेत आढळते. वास्तवावर त्यांची पकड विलक्षण स्वरुपाची होती, त्यामुळेच सामाजिक जाणीवेच्या कविता सामर्थ्याने त्यांनी लिहिल्या. विशाल, वैविध्ययुक्त अशा सामाजिक अनुभवाचा वेध घेऊन त्यावरील आपल्या वैयक्तिक प्रतिक्रिया देणारी त्यांची कविता पिचलेल्या, शोषिताच्या बाजूने उभी राहणारी कविता असल्यामुळे श्रेष्ठ कविता ठरते. पाडगावकर नमूद करतात त्यानुसार त्यांची कविता एकीकडे तेजाब आणि दुसरीकडे गंगा बनते. जशी पूर आलेली नदी आपले काठ जुमानत नाही तशी ती कार्यरत होते.

करंदीकर यांच्या काव्य प्रतिभेने आपल्या कवितेला सामाजिकतेचे बहिर्मुखतेचे सामर्थ्य बहाल केले त्यामागचे कारण पाहता पुन्हा आपण त्यांच्या व्यक्तिविशेषांकडे येतो. केवळ विद्वानातील चर्चेतून ट्रेंड निर्माण झाला म्हणून नाही तर समाजाच्या सर्व घटकाशी जोडून घेण्याच्या उपजत मानवी प्रवृत्तीतून त्यांच्या सामाजिक कविता



ISSN No. 2319-6025

येतात. त्यामुळे समाज वास्तवाच्या विविध अंगांचा तपशील समर्थ प्रकारे या कविता आपल्या आत घेतात. म्हणूनच हृदय हेलावून टाकणारा अंतर्मुख प्रत्ययही देतात. श्रेष्ठ काव्यजाणिवांचे समाज वास्तवाशी संमीलन साधत त्यातून मानवी जीवनाविषयीच्या आस्थेचे चित्र त्या निर्माण करतात.

वर उल्लेख केला ती सर्व व इतर आणखीही काही बुद्धिमान माणसे आपल्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक जीवनाचा कीस पाडत होती. आपल्या देशाच्या प्रगतीतील अडथळे हे रूढ विषम समाज रचनेत असल्याचे झालेले अधोरेखन साहित्यात बदल घडवत होते. शोषितांप्रती सहानुभाव वाढीस लागावा हा हेतू कार्यरत झाला होता. वास्तविक मराठी साहित्याचा प्रारंभापासून तोच आवाज होता, पण आता समाजातील शोषितांचे प्रश्न शोधण्याची मोहीम वरच्या जगात निर्माण झाली आणि ती तिकडून आपल्याकडे धडकली असेही चित्र अवतरले. विंदांनी 'तुकोबाच्या भेटी शेक्सपिअर' या कवितेतून हेही अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला असावा. प्रत्येक समाजात आपापल्या जगण्याच्या अनुभूतीनी, अनुभवांच्या प्रत्ययांनी आपले ज्ञान संचित निर्माण केलेले असते, आपले तत्वज्ञान निर्माण केलेले असते, जितकी प्रतिकूलता अधिक सोसली तितकी त्या समाजाची आध्यात्मिक जाणीव खोल गेली ही वस्तुस्थिती असते. तेथील घटकांच्या परस्पर संबंधांशी याचा अन्वय असतो. या सर्व भानातून विंदा 'तुकाराम' ही प्रतिमा आपल्या काव्याच्या केंद्रात ठेवत असावेत त्यामुळे अध्यात्म आणि वास्तव ('पत्नीचे कजागपण' या प्रतिमेचा विविध प्रकारे विचार करू शकू.) यांची एक विशेष संगत ते या कवितेत प्रस्तुत करतात.

'तुकोबा' ही त्यांची प्रतिमा भारतीय समाजातील खूप खोलवर रुजलेले माणसाच्या शोषणाचे प्रतीक होऊन येते तर 'शेक्सपिअर' ही प्रतिमा पाश्चीमात्यी जगाकडून आलेल्या आधुनिक जागरणाच्या गोष्टी सूचित करते. 'तुकाराम' वगळून आपण जर केवळ शेक्सपिअरचा नाद केला तर सारेच वरपांगी, दांभिक होऊन जाईल याची महत्वपूर्ण जाणीव त्यांच्या कवित्व शक्तीने विंदांच्या अंतर्मनाला करून दिली हे त्यांचे सर्वाधिक महत्वाचे वैशिष्ट्य प्रस्तुत कवितेत अपोआप आविष्कृती साधते. बाहेरच्या देशांतून समाज सुधारणेचे येणारे जोराचे वारे आपल्याकडे फिरवताना आपल्याला माहीत असायलाच हवे की आपले हे 'तुकाराम' कुठेकुठे दडपले गेले आहेत. त्यांच्या अंतरंगी काय खदखदत आहे. विंदा ही जाणीव कवितेत चित्रित करताना तुकोबाला भेटायला शेक्सपिअर स्वतः आलेला आहे अशी कल्पकता दाखवतात. अर्थात ते फार कळीच्या वास्तवाला धरून बोलतात. देवळाची घंटा होताच तुकारामाने लगबगीने घरी जायला उठणे, शिवाय पत्नीच्या कजागपणाचा उल्लेखही करणे हे फक्त विनोद म्हणून घेऊन सोडून टाकण्यासारखे नाही. त्यामध्ये प्रस्थापित स्त्री पुरुष जीवन

नीतीच्या संकल्पनांनी आकारणारे एक काचणारे वास्तव त्यांना निर्देशित होते असे म्हणता येईल. त्यातून तुकारामाचा रात्रंदिन चालणारा युद्धाचा प्रसंग अधिक स्पष्टता प्राप्त करतो. कोणाकडे सहानुभूतीने पाहायचे आणि जाणत्याला कसे चिरडून टाकायचे याच्या आखलेल्या चाणाक्ष 'गणिता'कडे बघणारा तुकोबा, देवळाची घंटा वाजल्याबरोबर घरी जायला उठणारा तुकोबा या प्रतिमा अंतर्मुख करतात.

रूढ भारतीय सामाजिकतेत शोषणाची चित्रविचित्र वलयांकित रूपे असल्याची वास्तव चित्रे विंदांच्या कवितेने प्रकट केली. शोषणरहित समाज निर्माण करण्याचा विडा उचलू बघणाऱ्या आधुनिक सरण्यांनी घातलेल्या सादांना विंदांच्या कवितेने दिलेले पडसाद हे आपल्या भूमीशी असणाऱ्या संवादातून होते हे त्यांच्या सर्व सामाजिक कवितांमधून अधोरेखित करता येईल. निरामय समाज निर्माण करण्याचे वेड अर्थातच त्यांच्या कवितांनी घेतलेले होते. त्यासाठी आवश्यक त्या विविध पातळ्या त्यांनी आपल्या प्रखर प्रकाश झोतात आणल्या होत्या असे वाटते. याच कोटीतून त्यांनी स्त्री पुरुष संबंधांचे, वर्ग भेदाचे, जाती भेदाचे, धार्मिक कर्मकांडांचे, सत्तात्मक संबंधातून निर्माण होणाऱ्या शोषणाचे वास्तवातील अनुभवविश्व कवितेसारख्या आत्मनिष्ठ साहित्य प्रकाराच्या आस्थेच्या परिघात घेतले. व त्यावरील आपल्या जळजळीत प्रतिक्रियांचे अंजन प्रस्तुत केले.

धार्मिक कर्मकांडांच्या माध्यमातून नैतिकतेचे स्तोम माजविणाऱ्या प्रवृत्तींचा त्यांनी घेतलेला समाचार स्वच्छ समाजभूमी निर्माण करण्यासाठी आहे याची प्रचिती त्यांच्या 'छळ' नावाच्या छोट्याशा कवितेतून घेता येईल. त्यामधून कवी काय प्रकारचे काम करत असतो त्याचे दिपविणारे दर्शन घेता येईल. एकूणच 'दाक्षिण्य' या ढोंगांतून स्वतःची सुटका करवून घेण्याची धिटाई या कवितेत दर्शवत विंदा 'घेत' सारख्या अजरामर कवितेत नैसर्गिक दातृत्वाचे महत्त्व समाजासमोर आणतात. तसेच नैसर्गिक वृत्तींचा जागर त्यातून साधतात. आपण जे काही शिकावे ते निसर्गाकडूनच शिकावे, त्याच्याच सारखे दातृत्व, प्रतिकाराचा कणखरपणा, कलावंती स्वच्छंदपणा, व्यापकता आत्मसात करावी हे फार सुंदरपणे तिथे आविष्कृत होते. त्यांच्या प्रेमकवितेत भेटतो तो सखाही जणू सबंध समाजाला दातृत्वाची आकृती कशी काढायची तेच दर्शवितो, त्यासाठीच तो म्हणतो, कधी वाटते तुला द्यावे असे काही । ज्यात लपेल आकाश, लोपतील दिशा दाही ।। असे काही तुला द्यावे भाबडे नि साधे भोळे । राधेचीही पडो दृष्ट । द्रौपदीचे दीपो डोळे ।। माझे नसून मी द्यावे । तुझे व्हावे दिल्यावीण । पुन्हा पुन्हा जन्म घ्यावे । जन्म टाकाया गहाण त्यांच्या कवितेत आपण फक्त मर्यादित अर्थाने 'प्रेम काव्य', 'निसर्ग काव्य' असे न पाहता त्याच्यातील व्यापक सामाजिक सहानुभाव पाहावा म्हणजे मग त्यांची विशाल दृष्टी, त्यांची



ISSN No. 2319-6025

समाजाकडे पाहण्याची नवी नैतिकता लक्षात येईल. चुकली दिशा तरीही आकाश एक आहे । हे जाणतो तयाला वाटेल तेथ न्यारे ही चुकल्या मुशाफिराची प्रतिमा कशाचे प्रतिक होईल? कोणत्या ना कोणत्या कारणानी आपापली वेगळी चूल मांडू पाहणाऱ्या जगात समूहभान जागृत करणे आज अधिक टोकदार झाल्यावर विंदांच्या या कवितांनी जतन करून ठेवलेल्या संवेदनांनी उठाव साधला पाहिजे.

धार्मिकतेच्या नावाखाली खोटे लबाडीचे मोठेपण, दिखाऊ कर्तव्यांचा दांभिकपणा यातून समाज सुटला पाहिजे आणि त्याच्या दृष्टीला नेमके शोषण कोण, कोणाचे व कसे करते ते दिसले पाहिजे या उद्दिष्टांनी प्रेरित ही कविता एका सुंदर, निरामय, निखळ, स्वच्छ जगण्याकडे चालण्याच्या प्रेरणा प्रस्तुत करते. वास्तवात आपण जगतोय म्हणजे काय करतोय तर धार्मिक कर्मकांडांच्या आहारी जाऊन जगण्याची ढोंगे साजरी करतोय! ए साल्ये 'हरि' तालिकेवाल्ये! (स्त्री साठी पुरुषी संबोधन हा गझल चा स्वभाव मुळातून पाहिला पाहिजे!) प्रत्येक पापाबरोबर । तू । होतेस अधिक गोड । आणि । प्रत्येक पुण्याबरोबर । अधिक जहरी; । श्रीहरी, श्रीहरी, श्रीहरी. 'छळ' या कवितेशेजारी 'पडजीभ' ही कविता छापली आहे ती वाचावी. आपल्या समाज पुरुषाने 'ती' आणि 'तो' यांची व्यक्तिमत्त्वे कशा स्वरुपाची आकारास आणली? त्यातून निरामय असे जीवन कुठे गडप झाले? यावर आपल्या मनात प्रस्तुत कविता चिंतन सुरु करून देतात.

विंदांची कविपणावर श्रद्धा होती, कवी संसाराचा, जीवनाचा शिल्पकार असतो या तत्त्वाला त्यांची मान्यता होती. पण कवी आणि कवडे यांतील फरक वाचकांच्या ध्यानातून सुटता कामा नये हेही त्यांनी कटाक्षाने 'तेच ते' याच कवितेत अधोरेखित करून ठेवले आहे. 'शिळा शोक आणि बुळा विनोद, भ्रष्ट कथा आणि नष्ट भोग' यात मश्गुल राहणाऱ्या कवी लेखकांना नेमाडे यांच्या प्रमाणेच मोठी चपराक विंदांनीही देऊन ठेवली होती. कवीला सामाजिकतेचे भान असायलाच हवे या आग्रहातून ते कार्यरत झाले आहेत. उपरोधात्मक शैलीवाटे त्यांनी समाजातील न्यूने अधोरेखित केली ती स्वायत्त, स्वतंत्र, मोकळा व सुंदर समाज निर्माण करण्याच्या मिषानेच.

समाज ही वस्तू प्रामुख्याने स्त्री-पुरुष या घटकांनी तयार होते. पण त्यांच्या जीवनाचे संपूर्ण नियोजनच समाज ही वस्तू आपल्या हातात घेते. मग समाजावर, धर्मसत्ता ज्याच्या हातात गेली; त्या प्रवृत्तीचे वर्चस्व प्रस्थापित होऊन समाज ही जणू त्याची खाजगी मालमत्ता असल्याप्रमाणे चित्रे निर्माण होत राहतात. 'दास स्थिती' ला आणल्या गेलेल्या (खडक फोडतो अपुले डोळे) या प्रकारच्या समाजाला सतत आपल्या नियंत्रणाखाली ठेवण्याच्या कुटील हेतूतून लिंग पातळ्या विशिष्ट प्रकारे नियोजित करण्याचे; धूर्त धोरण आखण्याची खबरदारी घेतली जाते. याची खोलातून

कल्पना आलेल्या विंदांच्या काव्य जाणिवा म्हणूनच ए साल्ये 'हरि' तालिकेवाल्ये! असा उदगार उत्स्फुर्तपणे उसळवतात! समाजावर सत्तात्मक नियंत्रणाचा कंड असणाऱ्या प्रवृत्ती; प्रतिष्ठित अप्रतिष्ठित , पाप पुण्य, नीती अनीती, श्रेष्ठ कनिष्ठ या तऱ्हेच्या माणसांचे एकमेकापासून विभाजन करणाऱ्या अनेकानेक संकल्पना समाज मानसात शतकानुशतकांपासून पद्धतशीरपणे दृढ करण्याची नीती अवलंबतात.

काचणारे बंध तोडून टाकावेत या प्रेरणा त्यांच्या कवितेत ठायी ठायी प्रकटतात. माणसात अशी ताकद निर्माण व्हावी की त्याने धाडसाने आपल्याला गुलाम करणाऱ्या साऱ्या गोष्टीचा समाचार घ्यावा. डरतात वादळांना जे दास त्या धुवावे; । हे शीड तोडले की अनुकूल सर्व वारे, आशा तशी निराशा, हे श्रेय सावधांचे; । बेसावधास कैसे डसणार हे निखारे. असे त्यांचे प्रेरक शब्द त्या काळातील परिवर्तनाची दिशा दृढ करत होते.

विंदांच्या शोषण व शोषित रेखाटणाऱ्या कविता या वास्तवाचे भान वाचकात निर्माण करतात. 'थोडी सुखी थोडी कष्टी' नावाची कविता वरवर साधीच वाटणारी कविता, प्रासंगिक कविता. एक सासुरवाशीण खूप दिवसांनी माहेरी आली. गाडीतून उतरून स्टेशनवर टांग्यात चढली. टांगेवाला ओळखीचे हसला. पण तिला तो कोण हे आठवले नाही. टांगा रस्त्यारस्त्याने पुढे निघाला. तो जेव्हा शाळेपुढून जाऊ लागला तसे तिला टांगेवाला आपला बालमित्र चंदू असल्याचे लक्षात आले. आणि तिच्या नजरेपुढे ते जुने तरल दिवस तरारले. पण समाज भान इतके तीव्र आहे की ही दोन माणसे आतून काळीज हलले तरी आपली माणूस ही पातळी जगवूच शकत नाहीत. त्यावेळी त्यांच्या जीवाची होणारी उलघाल कवी सामर्थ्याने चित्रित करतो. माणसे लिंगभेद, स्तरभेद, वर्गभेद, वर्णभेद यांची बळी आहेत. भारतीय रूढ सामाजिकतेत माणूसपणाच्या अनेक अवस्था आपण हरवून बसलो आहोत हे वास्तव असे चटका लावते. प्रतिष्ठित घराणे आणि सामान्य टांगेवाला यातील अंतर ओलांडता न येणारे...भारतीय सामाजिकता ही अशा अनेक गुंतागुंतींनी भरलेली आहे. जेव्हा एखादा भारतीय कवी वा लेखक येथील सामाजिकतेशी संवाद साधू लागतो तेव्हा त्यातील गुंत्याना उकलणे सोपे असत नाही. तो प्रयत्न झाल्याने करंदीकरांची कविता ही अपोआप बहुपेडी रूप प्राप्त करू लागते.

समाज म्हटले की आपल्याकडे सामाजिक शोषण हे आलेच. तर या सामाजिक शोषणाचे चित्रण त्यांच्या विविध शोषित व्यक्ती दर्शनात्मक कवितांतून घडते. 'कावेरी डोंगरे' ही कविता वाचकाला चटका लावते. तिच्या जीवनाला अगतिक व शून्यवत करणारा गुंड्या गोखलेचा मध्यम वर्गीय लग्न व्यवहार या समाजाच्या अर्थकारणाला धरूनच निर्माण होतोय. या नैतिकतेत कावेरीच्या स्वप्नांचा चुराडा सहजच होऊ



ISSN No. 2319-6025

शकतो. 'संसार' या कवितेतील पती-पत्नी आर्थिक ताणाखाली कशा तडजोडी करत जगत असतात ते पाहता अस्वस्थता निर्माण होते. 'सरोज नवानगरवाली' ही कविता तर बारावर जायच्या वाटेवरच्या जुन्या घरात वेश्याव्यवसाय करणाऱ्या तरुणीचे चित्रण करते. 'जे पाहत असता मनात मी लाजावे' अशी ओळ तिथे येते आणि त्यासरशी वाचकाच्या काळजाचा ठोका चुकतो. संपूर्ण जीवनाचे विरुपिकरण झालेली 'बकी'ही असाच ठोका चुकविते. स्त्री-पुरुष संबंधाना या अन्यायकारी अर्थ व सत्ताप्रधान जगात कोणकोणत्या प्रकारचे रूप प्राप्त होते, 'संसार' मधील स्त्री खिडकीत उभी राहून 'मी सुखात आहे' असे जे पुटपुटते आहे त्याला आदर्श नारी चे लेबल आपण आजवर लावत होतो पण विंदा ही संवेदना बदलून देतात. त्या परिवर्तना साठीच समाजात निर्माण झालेल्या वृत्ती प्रवृत्तींचे दर्शन विंदा आपल्या या व्यक्तीचित्रणात्मक कवितांतून घडवितात. त्यातील दारूणता दृष्टीसमोर आणतात. सामान्य माणसाची दुःखे पाहून कवीचे मन पिळवटून जाते. समाजात सर्वत्र पसरलेली ही शोषणाची चित्रे अर्थकारणाशी संबधित आहेत असे वाटून यंत्रावर ते श्रद्धा ठेवू बघते.

मार्क्सवादानुसार यंत्राच्या सहाय्याने उत्पादन वाढवण्याचे प्रयोग आपलेसे करावे यावर कवीची भिस्त निर्माण झाल्याचे आपण त्यांच्या 'यंत्रावतार' या कवितेमध्ये पाहतो. पाश्चिमात्यांच्या प्रगती साधण्याच्या योजनेत त्यांनी यंत्रक्रांती अनुसरली होती व त्यावेळी आपल्या बुद्धीवंताना आपलाही देश त्या प्रमाणेच गरिबीतून मुक्त होईल असेच वाटले होते. पण यंत्रानेही आपल्याकडे अपेक्षित क्रांती कुठे झाली? पुढे ते विंदानीच 'दंतकथा' या कवितेत अचूक दाखवले आहे. 'एकाक्ष अमेरिका', फ्रांसमधला दारूचा व्यापारी'. 'ब्रिटीशांचे कांगो नदीच्या प्रवाहाखालचे भुयार', 'रशियातला मोठा तुरुंग' या अतिशय विदारक वसाहतवादी वास्तव रेखाटणाऱ्या प्रतिमा आहेत. 'अन्याय मिटवणे' ही गोष्ट प्रत्यक्षात उतरेल असे दिसत नसल्याचे वास्तव या कवितेने अचूकतेने विचारात घेतले आहे. शोषितांकडे बघण्याच्या श्रेष्ठ कवीच्या अंतःकरणाची ही चित्रे आपल्याला अशी दिसतात. वास्तव लक्षात आल्यावर, ती जनता अमर आहे' मधील मृगाच्या वादळातून मी ऐकले मातीतील महापुरुषांचे आर्त निश्वास आणि विजेच्या कडकडत्या प्रकाशात पाहिले मानव ..... नाही रे उजाडत असे एक करुणाष्टकही त्यांच्या कवितेने आपल्या पुढ्यात घेतले आहे. 'समाज' आणि 'जनता' या दोन्ही संज्ञा करंदीकर यांच्या कवितेच्या माध्यमातून नीट उलगडता येतील. जनतेच्या मुक्तीसाठी । अजून एक समर आहे । आणि जिचा आत्मा एक । ती जनता अमर आहे।' यामध्ये एका समाजाच्या सीमारेषा ओलांडून विशाल अशा मानवी समाजाकडे वाटचाल अधोरेखित होत आहे.

एकीकडे मानवता धर्माचा ध्यास आणि दुसरीकडे सार्वजनिक जीवनात आढळणारी

सर्वंकष विषमता कवी अचूकपणे प्रकट करतोय. केवळ विषमता पाहून हात चोळीत बसणे ही निष्क्रीयता या कवितेला मान्य नाही. शोषणाची चित्रे पाहून तिच्या अन्तःकरणात प्रक्षोभ निर्माण होतो, तो प्रक्षोभ कृतीशील माणसाला कृतीप्रवण करतो. 'माझ्या मना बन दगड... असे संहाराचे अपरिहार्य कठोर दगडपण त्यातूनच पुढे येते. आपल्या बुद्धिनिष्ठ जाणिवांना संवेदनांच्या पातळीवर वाट करून देताना या कविता जन्मतात. त्यांच्या संवेदना तार्किकतेतून वाटचाल करतात (rationality), समाजात निरामयता निर्माण करण्याचा ध्यास या कवीला आहे. त्या दृष्टीतून कवी फार मोठा व खोल चिंतनाचा आवाका प्रस्तुत करतो.

'आपुली हाडे ब्रह्मांडाचे कुजके अंडे' या कवितेत प्रकटलेली दधिचीच्या हाडांविषयीची प्रतिक्रिया विंदांचे मन सुधारणांचे स्वरूप आणि शोषकांची मानसिकता अचूक चिमटीत घेते हेच सिद्ध करते. तसेच समाजात काहीएक पेरावे तर त्यातून निष्पन्न काय होईल ते काय सांगावे? अगदी अंतर्बाह्य विशुद्ध बियाणे आपण कुठून मिळविणार? आणि मिळालीच तर राब मध्ये शिरणाऱ्या भ्रष्टतेला कसे वेगळे काढणार? खुळा दधिची फसला देऊन अपुली हाडे असुर वधास्तव. त्या वज्राने तेव्हापासून मानव आहे कापीत मानव यानंतर काय खुळेपण त्या येशूचे रक्त दिले अन सोडविला नर, रक्तात तुझ्या बुडवून यांनी रुचकर केली आपुली भाकर.. शोषणासंदर्भातील मानवी दुःखाचा हा सोलीव गाभा असा सहज करंदीकरांच्या कवितेत चिंतनशीलतेतून प्रकटतो. विठ्ठला विठ्ठला भाकरी गा होई । पोटामध्ये येई शांतवाया । असा तिरकस सूर भक्ती आणि कर्मसिद्धांत यांचा मेळ घालू पाहणाऱ्या आतताई अभंगातून ते आविष्कृत करतात तेव्हा वचन साहित्याचीही स्मृती जागते.

शोषण करणाऱ्या प्रस्थापित समाजव्यवस्थेला फास लागला पाहिजे ही संवेदना कवी 'चिंधी' या कवितेतून आविष्कृत करतात. समतेचे जग निर्माण व्हावे हे स्वप्न साकार होते याची शाश्वती नसल्याची जाणीव आतून अस्वस्थ असल्याचीही प्रचिती येथे ते देतात. समाज वास्तवाची वस्तुस्थिती सूक्ष्मपणे समजून घेणाऱ्या विंदाना नव्या जगावर भुंकत बसणारी चिंधी ही प्रतिमा सुचते. ही प्रतिमा आपल्यात एक विलक्षण कारुण्य धारण करून आहे. माणसाला सामाजिक शोषणातून पूर्णता सुटका मिळेल अशी शाश्वती कवीला आढळत नाही... कारण सामान्य माणसाची पिळवणूक ऐतिहासिक आहे. हेच ऐतिहासिक शाश्वत वास्तव 'दातापासून दाताकडे' या कवितेत ते रेखाटतात. जगात नेहमी सर्वसामान्य जनतेला पिळवणूकीलाच सामोरे जावे लागते हे वास्तव असून इजिप्त, चीन आणि भारतीय या जगातील प्राचीन मानल्या जाणाऱ्या संस्कृतींनी तेच कसे सिद्ध केले त्याची उदाहरणे विंदानी विचारात घेतली. पिळवणूक करणाऱ्या शक्तीचे प्रतीक म्हणून 'दात' ही प्रतिमा येते आणि त्यापासून सोडवण्यासाठी



ISSN No. 2319-6025

म्हणून पुढे धावून येणारे पुन्हा सामान्य जनतेला दुसऱ्या 'दाताकडे'च नेतात हे विदारक सत्य येथे अधोरेखित होते. नेहमी माणसांना एका शोषण व्यवस्थेकडून दुसऱ्या शोषण व्यवस्थेकडेच चालविले जाते. 'कीर्तन' या कवितेतून देवळाच्या भिंतीच्या बाहेर ठेवलेली माणसे कीर्तनासाठी आसुसलेली असूनही त्यांच्यापर्यंत त्यातील कोणतेच शब्द पोहचत नाहीत व ज्यांनी 'शब्द' आपल्या मुठीत ठेवले त्यांची नजर 'खडीसाखरे'वर! हे वास्तव या कवितेचा डोळा टिपत आहे. शोषणातून सोडविलेल्या प्रक्रियेचेही परावर्तन पुन्हा बुवांचे कीर्तन या खडीसाखरेसाठी चुळबुळणाऱ्या वास्तवातच झालेले कवी दाखवतो. 'नेहरू' या राजकीय वातावरणावर प्रतिक्रिया देणाऱ्या कवितेमध्येही 'तूच सोडविलेले आमचे हात' ही प्रतिमा 'समाज' या पातळीवरचे राजकीयतेचे भान निर्माण करते. सामाजिक स्तरावरून राजकीयता किती अस्थिर असते व ती कोणत्या कारणांनी असते या चिंतनाकडे कवी आपल्याला पोहचवितो. हात आपले असतात पण आपल्या हातात काहीच नसते, सगळे एकमेकावर उलटणार असतात की काय ही रूढ जाणीव सामाजिक पातळीवरील राजकीयतेची स्थायी प्रकृती होत आहे की काय? मग नैसर्गिक प्रकृती कोणती? करंदीकर नेहमी नैसर्गिक आणि अनैसर्गिक यातील फरक अधोरेखित करून नैसर्गिक जे जे आहे त्याचा सुंदर निरामय समाज निर्मितीच्या संदर्भातून आग्रह धरतात. समाजातील परस्पर नात्यांचाही त्यांनी या प्रकारे विचार केला आहे.

आपल्याकडच्या भागात आले तर गांधीजींची विना मोबदला हजामत करून देईन असे म्हणणाऱ्या 'धोंड्या न्हावी' शी कविमनाचा जुळलेला धागा माणूसपणाच्या संवेदना निर्माण करतो ते नैसर्गिक. पण त्याच्यात व आपल्यात निर्माण केले गेलेले अंतर अनैसर्गिक. ('थोडी सुखी थोडी दुःखी' मधील माहेरवाशीण आणि टांगेवाला) तर या सर्व अस्वस्थकारक सामाजिक वास्तवातून जात असता मनाची उभारी कशाने नष्ट होणार नाही याचाही शोध करंदीकर घेतात. त्यासाठी आपल्याला त्यांच्या 'हिमालयाएवढ्या मातीच्या ढिगावर', 'असे काही पाहिले आहे', 'पण हे श्रेय तुझेच आहे' (मी अजून उभा आहे) अशा कविता आठवतील. शोषणावर उभ्या असणाऱ्या प्रस्थापित समाज रचनेत अन्नाशिवाय, कपड्याशिवाय, ज्ञानाशिवाय, मानाशिवाय तडफडणाऱ्या शोषितांचे दुःख कवीतील माणसाला पाहवत नाही. समाज रचनेत परिवर्तन आणण्याची शक्ती हवी आहे पण त्या साऱ्याचे फोलपण जाणवल्यावर 'माझ्या मना बन दगड' असा या कवितेचा कठोर निश्चय आकारतो. 'दगड' ही प्रतिमा संहाराच्या अपरिहार्य कठोरतेचे सूचन करते.

प्रारंभी विंदांची सामाजिक कविता बहिर्मुखी होती. ती केवळ तपशिलावर भिस्त राखत होती. 'स्वेदगंगा' मधील 'मजूर' या कवितेत मजुराचा अज्ञानाच्या दारिद्र्याच्या

भोवती संसार चालू आहे, त्याच्या भोवती फक्त हे एवढे पोरांचे लेंढार आहे. दारू, जुगाराने पछाडलेले स्मशानवत घर मिळालेल्या मजुराचे जगणे कवीने कवितेच्या डोळ्याला जे दाखविले ते करुणेच्या स्पर्शासह होते. (वि. म. कुलकर्णी यांच्या 'मजुरांचा तांडा' ची आठवण होते.) पण या प्रकारच्या पाऊलखुणा उमटवत त्यांची कविता शोषणाच्या तळामुळापर्यंत पोहचली आणि तेथील विदारक वास्तवाला हात घालून बसली हे मात्र निश्चित. मनामनातून शिवशिवणाऱ्या विराट विकलतेला माझ्याजवळ शब्द नाही..अनाथ जगन्नाथासाठी माझ्याजवळ कूस नाही. क्रूस नाही, माझ्यासाठीही क्रूस नाही अशी जळजळती वेदना ती प्रकट करते. प्रस्थापित शोषण व्यवस्थेतून साकारलेल्या पत्र्यांच्या चाळीत कुढणारी माणसे बघून ते दुभंगून जातात. 'जग बदलायचे आहे' या घट्ट धारणेतून प्रवास करताना त्यांना त्या बाबतचे वास्तव जे दिसले त्यातून ही कविता आविष्कृत झाली.

'मजूर' पासून ते 'खुळा दधिची' पर्यंत त्यांच्या सामाजिक जाणीवेचा प्रवास आपल्या हाती येतो. त्यामध्ये शोषणाच्या संदर्भातून विविध सामाजिक घटकाना स्पर्श होतो असे दिसते. त्यांचा हा सारा प्रवास प्रागतिक विचारसरणीतून प्रगल्भतेकडे, व प्रगल्भतेतून परिणत प्रज्ञ अवस्थेकडे होणारा प्रवास आहे. मजुराला, बकीला, कावेरी डोंगरेला, हरितालिका व्रत अंगिकारणाऱ्या प्रवृत्तीला, पडजीभेवाचून असणाऱ्या जिभेला सोबत घेऊन हा प्रवास 'अष्टदर्शने' कडे जातो. नैसर्गिक धारा, त्यातून निर्माण होणाऱ्या विचारधारा आणि प्रज्ञावंतांच्या प्रतिभावंतांच्या धारणा या त्रिधारांतून व्यक्ती आणि समाज यांची आंतरिक नाती प्रस्थापित होत असतात. याला मा. भालचंद्र नेमाडे यांनी युगशैली असे म्हटले आहे. त्यांनी त्या संदर्भातून अवतरण क्षमता आणि तुकाराम यांचा संबंध अधोरेखित केला आहे. व्यवहारातील वाक्याला काव्य जाणिवेतून महावाक्याची महत्ता प्राप्त होत असते म्हणतात...त्या प्रस्थापितपणाच्या स्वरूपाचे दर्शन विंदांची ही कविता तत्त्वचिंतनाच्या अंगाने घडविते. 'बाराकडे निघालेला रस्ता', 'ते बघण्याची लाज' या प्रकारच्या अनेक प्रतिमा काव्य प्रतिके बनतात. कारण या कविता अशा अनेक महावाक्यांनी घसघशीत आहेत.

पूर्वसुरींपासून समकालीनांपर्यंत, नव्याने लिहिणाऱ्या नवी दीप्ती दाखवणाऱ्या कवीच्या ताज्या दमाच्या पिढ्यापर्यंत ते लिहित राहिले; जवळजवळ ६५ वर्षे ते लिहित होते. ते अत्यंत तेजस्वी काळात लिहिते असणारे कवी होते. वेगवेगळ्या विचारप्रणालीतून जाऊनही कुठल्याही एकीशीच त्यांनी आपल्या कवितेला बांधून ठेवले नाही. पोथीनिष्ठपण त्यांच्यात नव्हते. त्यामुळे त्यांची कविता जिवंत माणसाची अंतर्बाह्य स्पंदने कवेत घेण्याची प्रेरणा बनली आहे. म्हणूनच तिने मोठ्या प्रमाणात सामाजिकतेचा अंश आत्मसात कसा करता येईल याचे प्रात्यक्षिक प्रस्तुत केले आहे.



ISSN No. 2319-6025

समाज पातळीवरील सत्याचा सोलीव गाभा आपल्या ओंजळीत घेऊ पहिला आहे. पौराणिक मिथकांपासून प्रत्यक्षानुभूती देणाऱ्या प्रत्ययांकित अनुभवविश्वांमधून भारतीय पातळीवर मानवीयतेच्या वावराखाली काय आवश्यक आहे त्याची स्पष्टता त्यातून प्रत्ययास येते. प्रत्यक्षात श्रेष्ठ स्वरूपाचे मानवी जीवन भ्रष्ट, निराश व यांत्रिक करण्यात सत्तापिपासुवृत्ती नेहमीच कारणीभूत असते हे जागरण सामान्य माणसात निर्माण करण्याचा संदेश ही कविता देते. माणसांनी जागं झालं पाहिजे, शोषणाविरुद्ध उभं राहिलं पाहिजे, खऱ्या आनंदाचा शोध व ध्यास घेतला पाहिजे हा तिचा आग्रह आहे.

**संदर्भ**


१. सारंग विलास, अक्षरांचा श्रम केला, मौज प्रकाशन गृह, मुंबई

२. राजाध्यक्ष विजया, बहुपेडी विंदा खंड १ व २, मौज प्रकाशन गृह, मुंबई

३. विंदा करंदीकर, स्वेद गंगा, प्रस्तावना अनंत काणेकर, रत्नागिरी, १९४९

४. करंदीकर विंदा, समग्र, प्रस्तावना वसंत पाटणकर

५. पाडगावकर मंगेश, संहिता, प्रस्तावना कॉटीनेंटल प्रकाशन, पुणे

६. करंदीकर गो. वि., परंपरा आणि नवता, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई


■ ■ ■

## आवाहन

पत्रिकेसाठी शोधनिबंधाची शब्दमर्यादा १५०० ते २००० शब्द आहे. निबंध ओरिजनल श्रीलिपीच्या कोणत्याही फॉण्टमध्ये, एमएस वर्ड/ पेज मेकरमध्ये टाईप केलेले असावेत. (फॉण्ट साईज १३). आपले शोधनिबंध shivimmarathi@gmail.com या इ-मेलवर सॉफ्ट कॉपीमध्ये (ओपन आणि पीडीएफ फाईल) पाठवावेत. तसेच डॉ. अरुण शिंदे, कार्यकारी संपादक, शिविम मराठी संशोधन पत्रिका, द्वारा नाइट कॉलेज, बिंदू चौक, कोल्हापूर.४१६००२ या पत्त्यावर हार्ड कॉपी पाठवावी.

कृपया, आपण पत्रिकेचे लेखक व वर्गणीदार होऊन भाषा व साहित्य संवर्धनाच्या या 'अक्षर चळवळी'मध्ये सक्रिय योगदान द्यावे, ही विनंती. पत्रिकेची वार्षिक वर्गणी रु. २००/-, पंचवार्षिक वर्गणी रु. १०००/- व आजीव सदस्य वर्गणी रु. ५०००/- आहे. आपल्या सूचनांचे स्वागत आहे.